दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ३०६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, मंगळवार, दि.१७ जून २०२५




## चोरट्यांचा एक कोटी रुपयांच्या सोन्यावर डल्ला, पोलिसांचा सिनेस्टाईल पाठलाग



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१६, नाशिक :** मनमाड शहरातील डांबरे कॉलनी परिसरात व्यावसायिक मुर्तुजा रस्सीवाला यांच्या बंद घराचे खिडक्या तोडून घरातील तब्बल १ किलो ५५ ग्रॅम सोने व काही रोकड चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली होती या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती दरम्यान नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक पदी नव्याने दाखल झालेले बाळासाहेब पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेला या गुन्ह्याची उकल करण्याच्या सूचना दिल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आपलं कौशल्य वापरत सिनेस्टाईल पद्धतीने त्यांचा पाठलाग करून संजय किशोर गायकवाड व राकेश अशोक संसारे दोघे राहणार मनमाड व राजेश राम शंकर शर्मा राहणार नाशिक या तिघांना ताब्यात घेत चोरी गेलेले १ किलो ५५ ग्रॅम सोने ज्याची बाजारात किंमत एक कोटी पाच लाख ४० हजार इतकी असून हे हस्तगत केले असून या कारवाई बद्दल स्थानिक गुन्हे शाखेचे परिसरात कौतुक होत आहे

काय आहे प्रकरण?

मनमाड शहरातील कॅम्प परिरात असलेल्या डमरे कॉलनीत अल्युमिनियम चे दरवाजे ,खिडक्या बनविणारे व्यापारी मुरतुजा रस्सीवाला यांचा वर्कशॉप असून थोड्या अंतरावर ते राहत असलेला बंगला आहे मुरतुजा हे रविवारी ८ जून च्या रात्री आपल्या आईला आणण्यासाठी आर्वी येथे गेले होते त्यानंतर सोमवारी दुपारी त्यांची पत्नी आणि मुलगा हे घरी आले व नंतर संध्याकाळी नाशिकला गेले. त्यानंतर बुधवारी सकाळी ६ वाजता मुरतुजा हे घरी आले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की घरात चोरी झाली. विशेष म्हणजे घराच्या मुख्य दरवाज्याला लावलेला लॉक तसाच होता चोरांनी बंगल्याच्या माघील बाजूला असलेल्या खिडकीचे गज कट करून आत प्रवेश केला.

त्यांच्या बेडरूम मध्ये असलेल्या कपाटाचे दरवाजे तोडून त्या मध्ये ठेवलेले १ किलो ६०० ग्राम सोन आणि ८ लाख रोख रक्कम चोरून पसार झाले. या प्रकरणी मनमाड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरांविरोधात गुन्हा दाखल केला होता.

बंगल्याच्या मागील बाजूस असलेल्या खिडकीचे गज कापून घरफोडी करण्यात आली असून या घरफोडी १किलो ६०० ग्राम सोन आणि ८ लाख रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केले या घटनेची माहिती मुरतुजा आणि पोलिसांना दिल्यानंतर नाशिक येथील डॉग स्कोड , फॉरेन्सिक टीम यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली होती.

## एसटी बस चालक व वाहक दारूच्या नशेत ! वाहतूक नियंत्रकाची पोलिसात फिर्याद



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१६,अहिल्यानगर :** प्रवासी वाहतूक सुरळीत पार पडावी यासाठी राज्य परिवहन महामंडळातर्फे नियमावली आखून दिली गेली आहे. मात्र, या नियमांचे उल्लंघन करत एक धक्कादायक प्रकार अहिल्यानगर शहरात समोर आला आहे.

एस. टी. महामंडळाच्या अहिल्यानगर ते भिंवडी या बसवरील चालक आणि वाहक यांनी ड्युटीवर असताना मद्यप्राशन केले आणि प्रवासी भरलेल्या बससह मार्गस्थ झाले. ही गंभीर बाब प्रवाशांच्या लक्षात येताच त्यांनी नेप्ती (ता. अहिल्यानगर) शिवारात बस थांबवून ऑनलाईन टोल फ्री क्रमांकावर तक्रार केली. त्यानंतर हा प्रकार चव्हाट्यावर आला.

या प्रकरणी तारकपुर आगारातील वाहतूक नियंत्रक भिमराज रामभाऊ ढगे (वय ५२ रा. वाळकी, ता. अहिल्यानगर) यांनी शनिवारी (१४ जून) रात्री दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक किरण गोविंद केकान व वाहक सोमेश्वर जगन्नाथ रोडे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १३ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली. ढगे यांच्या फिर्यादीनुसार, त्यांनी १२ जून रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास तारकपूर स्थानकावरून भिंवडीकडे रवाना झालेल्या एमएच-२० बीएल-३१३८ क्रमांकाच्या बसची नोंद घेतली होती. संबंधित बसवर चालक किरण केकान आणि वाहक सोमेश्वर रोडे हे नेमण्यात आले होते.

मात्र, रात्री सुमारे १०.१५ वाजताच्या दरम्यान वरिष्ठ अधिकार्यांकडून कळविण्यात आले की, टोल फ्री क्रमांकावर प्रवाशांनी फोन करून तक्रार केली आहे की संबंधित बसचे चालक व वाहक हे दारूच्या नशेत आहेत आणि प्रवाशांनी नेप्ती गावाजवळ बस थांबवून ठेवली आहे. ढगे यांनी वर्कशॉपचे कर्मचारी सय्यद मुज्जामीन यांना घेऊन नेप्ती गावाजवळ धाव घेतली असता, बस रस्त्याच्या कडेला थांबवलेली दिसून आली आणि चालक व वाहक हे दारुच्या नशेत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर प्रवाशांना दुसऱ्या बसमधून पुढील प्रवासासाठी व्यवस्था करण्यात आली. पुढे या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी तोफखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## मुलांमध्ये रायगड, पालघर, पिंपरी चिंवडव व मुलींमध्ये ठाणे शहर पुणे ग्रामीण आणि लातुर य़ांची बादफेरीकडे आगेकुच





**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१६, पुणे :** म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीड़ा संकुल येथे शिवशक्ती महिला संघ आयोजित सुरू असलेल्या १ ली युवा महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी मुलांमध्ये रायगड, पालघर, पिंपरी चिंचवड व मुलींमध्ये ठाणेशहर पुणे ग्रामीण आणि लातुर य़ांची बादफेरीकडे आगेकुच केली आहे. सायंकाळच्या सत्रात मुलांच्या रायगड संघाने सोलापूर संघावर ४०-३० अशी मात करीत विजय मिळविला.मद्यंतराला रायगड संघाकडे २३-१४ अशी आघाडी होती. रायगड संघाच्या यतीन घरत, सार्थ सातमकर यांनी जोरदार चढाया करीत विजय साकारला.यश वाघवले यांनी पकडी घेतल्या. सोलापूरच्या रोमेश जाधव व संग्रामसिंग सारक यांनी चांगल्या चढाया केल्या तर आदर्श गायकवाड यांनी पकडी घेतल्या. पालघर संघाने जालना संघावर ४९-३८ असा विजय मिळविला.मद्यंतराला पालघर संघाकडे १७-१६ अशी निसटती आघाडी होती.पालघर संघाच्या करण रामगडे, जित मारडे यांनी जोरदार हल्ला चढवित जालना संघाचा बचाव मोडून काढला.समवेद पाटील याने चांगल्या पकडी केल्या. जालन्याच्या रितेश अडे यांनी एकाकी लढत दिली. तर युवराज राठोड़ याने पकडी घेतल्या.

पिंपरी चिंचवड व पुणे शहर संघ यांच्यात झालेला अटीतटीचा सामना ४७-४७ असा समान गुण संख्येवर संपला.त्यामुळे त्यांना साखळी १-१ गुण मिळाला.मद्यंतराला पिंपरी चिंचवड संघाकडे ३२-२० अशी आघाडी होती. चिंचवडच्या युती पार्थ चाजड,वडेवालकर यांनी आक्रमक चढाया केल्या. याशीर सुतार यांनी पकडी घेतल्या. पुणे शहर संघाच्या विशाल गाढवे व अथर्व सोनावणे यांनी चांगला प्रतिकार केला. तर यश पवार याने पकडी घेत चांगली साथ दिली.

मुलांचे इतर झालेले सामने- रत्नागिरी वि.वि.नांदेड (४०-२९),मुंबई उपनगर पूर्व वि.वि. सिंधुदुर्ग(५०-२३), नाशिक शहर वि.वि. हिंगोली(३९-१८),

मुलींमध्ये ठाणे शहर व सांगली यांच्यात अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात ठाणे शहर संघाने सांगली संघावर २७-२५ असा निसटता विजय मिळविला.मद्यंतराला ठाणे शहर संघाकडे १६-१० अशी आघाडी होती.ठाणे शहरच्या आरती शेळके हिने चौफेर आक्रमण करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तर जान्हवी पार्टे हिने पकडी घेत सुरेख साथ दिली. सांगलीच्या सनी कोळी हिने चांगल्या चढाया केल्या तर तबसुम पठाण हिने पकडी घेतल्या.

पुणे ग्रामीण संघाने अहमदनगर संगावर ३८-३३ अशी मात करीत आपली विजय मिळविला. मद्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे २३-२० अशी आघाडी होती. पुणे ग्रामीणच्या वर्षा बनसुडे व सानिका वासके यांनी चांगल्या चढाया करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. सई शिंदे हिने पकडी घेतल्या.

अहमदनगरच्या फौजीया शेख व ज्ञानेश्वरी धवन यांनी जोरदार प्रतिकार केला मात्र त्यांना मात्र त्यांना यश मिळाले नाही.श्रेया अडसुळ हिने पकडी घेतल्या. अत्यंत अटितटीच्या झालेल्या सामन्यात लातुर संघाने हिंगोली संघावर ५३-५० असा विजय मिळविला. मध्यंतराला लातुर संघ २३-३१ असा पिछाडीवर होता. मध्यंतरानंतर मात्र लातुरच्या स्नेहा नयने व जयश्री जाधव यांनी जबरदस्त खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. हिंगोलीच्या समिक्षा वाडवे व हर्षदा मस्के यांनी जोरदार खेळ केला मात्र मध्यंतरानंतर त्यांचा खेळ ढेपाळल्याने पराभवाचा सामना करावा लागला.

इतर सामन्यांचे निकाल- जळगाव वि.वि. सोलापूर (६७-१२), पालघर वि.वि. धुळे (५०-१७), नासिक ग्रामिण वि.वि. कोल्हापूर (३४-१४)

## थोडक्यात

### राजुरा येथे महिलेची हत्या ; अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल !



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१६ चंद्रपूर :** राजुरा शहरातील रमाबाई नगर येथील रहिवाशी महिला कविता रायपुरे (५५) या एकट्या घरी असताना त्यांचा खून झाल्याची घटना १५ जून रोजी सकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच राजुरा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आणि प्रेत शवविच्छेदनासाठी पाठविले. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

रमाबाई नगर येथील हनुमान मंदिराजवळील रहिवासी कविता रायपुरे यांचा मुलगा सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. तो रात्री ८ वाजता आपल्या कामावर गेला होता. त्यामुळे ही महिला घरात एकटीच होती.

दि.१५ जून रोजी सकाळी शेजारी राहणारी महिलेची विवाहित मुलगी ममता अलोणे हीने दार ठोठावले, तेव्हा त्यांचे घरातून कुणाचाही आवाज आला नाही. खिडकीतून बघितल्यावर या महिला कॅाटवर झोपून असल्याचे दिसले. मात्र, काहीही प्रतिसाद देत नसल्याने काही वेळानंतर दार उघडताच महिलेचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. या महिलेच्या डोके, छाती व चेहऱ्यावर तीक्ष्ण हत्याराने वार केल्याचे दिसून आले. या परिवाराचे कुणाचे वैमनस्य होते की अन्य काही देवाणघेवाणीच्या कारणांमुळे ही हत्या झाली, याचा तपास राजुरा पोलीस करीत आहे.


### बल्लारपूर येथे घरातून तलवार जप्त, आरोपी अटकेत



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१६, चंद्रपूर :** पोलीस स्टेशन, बल्लारपुर येथे दि. १६/०६/२०२५ रोजी पोलीस स्टाफ पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, निरज उर्फ लालु धनराज शेंडे, वय ३५ वर्ष रा. संतोषी माता वार्ड, बल्लारपुर हा लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचे उद्देशाने आपले राहते घरी धारदार तलवार बाळगुन आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून सदर खबरेची शहानिशा करणे कामी दोन पंचांना घेवून पोलीस स्टाफसह संतोषी माता वार्ड, बल्लारपुर येथील त्याचे घरी गेलो असता मुखबिरने सांगितलेल्या वर्णनाचा इसम त्याचे घरी मिळुन आला. इसम नामे निरज उर्फ लालु धनराज शेंडे याचे घराची झडती घेतली असता घरामध्ये एक लोखंडी धारदार तलवार मिळुन आल्याने दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा करून कायदेशीर कियारितीप्राणे तलवार जप्त करण्यात आली व आरोपी विरूध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पो. अधिक्षक रिना जनबंधु मॅडम, उपविभागीय पो. अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक श्याम गव्हाणे, यांचे नेतृत्वात सपोनि राजेंद्र गायकवाड, स.पो.नि. मदन दिवटे, सफौ. आनंद परचाके, संतोष दंडेवार, संतोष पंडीत, सुनिल कामतकर, पुरूषोत्तम चिकाटे, सत्यवान कोटनाके, पो. अंमलदार शरदचंद्र कारूष, विकास जुमनाके, वशिष्ठ रंगारी, खंडेराव माने, मिलींद अत्राम, भास्कर चिंचवलकर, शेखर माथनकर, म.पो. अंमलदार अनिता नायडू, इत्यादी पो. स्टाफ यांनी अतिशय कुशलतेने कार्यवाही केली आहे.

### पालशेतला महापूर ; जनजीवन विस्कळीत



**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.१६, पालशेत (गुहागर) :** कोकणात पावसाने चांगलाच जोर धरला असून शनिवार दिनांक १४ जून २०२५ रोजी गुहागर तालुक्यातील पालशेत येथे मोठी पर्जन्यवृष्टी झाल्याने ढगफुटी सदृश परिस्थितीला येथील नागरिकांना सामोरे जावे लागले, पालशेत बाजारपेठ, सावरपाटी, वाडीखाता, मारुती मंदिर परिसर, पाचमाड, आगडी देवी मंदिर परिसर याठिकाणी सखल भागातील दुकाने तसेच घरांमध्ये पाणी शिरल्याने येथील व्यापारी, दुकानदार यांना फार मोठे नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. सकाळपासून संतधार पाऊस सुरू होता असे नागरिक सांगतात. मात्र अचानक साधारण दोन तास झालेल्या पर्जन्यवृष्टी पावसाने येथील नदी, पऱ्या, व नाल्याना अक्षरशः महापूर आला होता. याचा सर्वाधिक फटका पालशेत बाजारपेठ तसेच सावरपाटी भागांना बसला, अतिवृष्टी पावसामुळे पालशेत, असगोली, कारूळ, बुधल, आदि समुद्र लगतच्या गावांना मोठा धोका निर्माण झाला होता. जवळजवळ दोन ते तीन तास याठिकाणी वाहतूक ठप्प होऊन जनजीवन विस्कळीत झाले होते. तर अनेक ठिकाणी शेती तसेच नारळी, पोफळीच्या बागायती मध्ये पाणी शिरल्याने शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

## संपादकीय



### एचटीबीटी कापूस बियाण्यांवरील बंदी

भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकाचा कापूस उत्पादक देश आहे. आपल्या पुढे फक्त चीन आहे. यावर्षी आपले कापसाचे उत्पादन होते ५८.४ लाख टन. जगाच्या तुलनेत हा वाटा तब्बल एक चतुर्थांश आहे. देशात सव्वा कोटी हेक्टरवर कापसाची लागवड होते. त्यातील ४२ लाखांहून अधिक हेक्टर क्षेत्र महाराष्ट्रात आहे. या वैभवी वर्तमानाला नख लागले आहे. राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी आत्म हत्येच्या वणव्यात होरपळतो आहे. कधीकाळी ढाक्याच्या मलमलीसाठी विदर्भातून कापूस जायचा, अशा लोककथा चर्चेत होत्या. सध्या त्याच पट्ट्यात प्रतिबंधित हर्बिसाइड टॉलरेंट बीटी (एचटीबीटी) कापूस बियाण्यांनी धुडगूस घातला आहे. दलालांच्या टोळ्यांना शेतकरी शरण गेले आहेत. सरकार असहाय्य अवस्थेत आहे.

मागील वर्षी २५ टक्के लागवड झालेल्या या बियाण्यांचा यंदाचा वाटा ४० टक्क्यांपेक्षा वाढेल. जैवविविधता धोक्यात येण्याच्या शक्यतेने काही पर्यावरणवादी सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढले. या बियाण्यांवर बंदी आली. आंध्र आणि तेलंगणपेक्षाही गुजरातेतून एचटीबीटीची रसद खुलेआम महाराष्ट्रात पोहचते. यातील गुप्त यंत्रणा थक्क करते. 'ना खाता, ना वही' पद्धतीची बिनबोभाट किमया म्हणजे एचटीबीटी व्यवहार. तसे म्हटले तर या वादाला दोन बाजू आहेत. एचटीबीटीबद्दलच्या नियमबाह्य प्रीतीत लाभाचा वाटा मोठा आहे. हे बियाणे तणनाशक असल्याने लागवडीचा खर्च घटतो. उत्पादन वाढते. एचटीबीटी बियाण्यांमुळे बोंडअळीचा प्रादुर्भाव टळतो असे म्हणतात. नेमका हा मोह शेतकऱ्यांना सोडवत नाही. जुने तुणतुणे सोडा आणि एचटीबीटीची वाट मोकळी करा, ही मागणी चक्क शेतकरी संघटनेने केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात बोलगार्ड-४ तंत्रज्ञान २०१७पासून उपयोगात आहे. आपल्याकडे अद्याप बोलगार्ड-३लाच मुभा नाही.

एका तथ्याकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. जगातील कोणत्याही उत्पादकाला उत्पादन खर्चाच्या आधारावर मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार आहे. अपवाद आहे तो फक्त शेतकरी. त्याच्या मालाचे भाव ठरवितात ते सरकार आणि व्यापारी. आता त्याला कुठले बियाणे पेरावे याचेही स्वातंत्र्य उरणार नसेल, तर त्याची मानसिक कोंडी समजून घ्यायला हवी. एचटीबीटीमुळे पर्यावरणावर, उत्पादनक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो. पारंपरिक बियाण्यांच्या जाती नष्ट होतात. पर्यावरण मंत्रालयाच्या अंतर्गत काम करणाऱ्या अनुवांशिक अभियांत्रिकी मूल्यांकन समितीचे (जीईएसी) या बियाण्याला समर्थन नाही, अशी उत्तरे शेतकऱ्याला दिली जातात. नव्या तंत्रज्ञानाला आपलेसे करण्यात सर्वांचे हित असल्याची शेतकऱ्यांचीही भावना आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार कपाशीत तण आणि अळीचा प्रादुर्भाव होत नाही. तसे झाले तर कीटकनाशके निर्माण करणाऱ्या कंपन्यांचा ताळेबंद विस्कटतो. कीडच लागणार नसेल तर, त्यांचे उत्पादन चालणार कसे? भावनांपेक्षा व्यवहार वरचढ ठरला तर, कृषिप्रधान देश वगैरे संकल्पना कशा धराशायी होतात त्याचे हे बोलके उदाहरण आहे. परवा यवतमाळ जिल्ह्यात चक्क पोलिस पाटलाने एचटीबीटीची पाकिटे घरी दडवली होती. त्याच्या अटकेने सखोल जाळे उलगडले. केंद्र आणि राज्याचा यावर पारदर्शी समन्वय हवा. गांभीर्य हवे. ठाम नियंत्रणदेखील. तसाही पीओपीवरील बंदीचा राज्यात झिम्मा सुरू आहे. प्लास्टिक बंदीचाही शिरस्ता तोच राहिला. पाच लाख रुपये दंड आणि पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा असतानाही अवैध प्लास्टिकचा संचार आहेच. ढिसाळ कारवाईचे अपघात पचवत 'बंदीग्रस्तां'ची लोकल सरकते आहे. प्रतिबंधित 'सीमी'च्या वऱ्हाडातील कारवाया अनेक वर्षे थांबल्या नव्हत्या. अकोल्यातून आठ कार्यकर्त्यांच्या मुसक्या आवळल्यावर यंत्रणा भानावर आली होती. 'सीमी'ची ही अवस्था आहे, तिथे बंदीचा कापूस उडाला तर लक्ष देणार कोण?

## अनधिकृत फेरीवाल्यांच्या समस्येतून मुक्ती केव्हा ?



राज्यातील जवळपास सर्वच प्रमुख शहरांमध्ये अनधिकृत फेरीवाल्यांची समस्या जटील बनत चालली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई सारख्या गर्दीच्या शहरांतील जवळपास सर्वच रेल्वे स्थानकांचा आजूबाजूचा परिसर अनधिकृत फेरीवाल्यांनी गिळंकृत केला आहे त्यामुळे शासनाने ठरवलेले फेरीवाला धोरण नक्की कोण राबवते आहे हा यक्षप्रश्न शहरांतील नागरिकांना पडला आहे.

रेल्वे स्थानक परिसरातील पदपथ प्रशासनाने नागरिकांना चालण्यासाठी बनवले आहेत की फेरीवाल्यांना आपली दुकाने थाटण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे हासुद्धा प्रश्न आज पडतो आहे. 'मुंबई महानगरपालिका, म्हाडा, पोलीस यांच्याकडून न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले जात नाही, अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पोलिसांना अनधिकृत फेरीवाल्यांना हटवता येत नसेल, तर सैन्याला बोलवायचे का ?' अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने जुलै २०२४ मध्ये आपली उद्विग्नता व्यक्त केली होती. आज एक वर्षानंतर सुद्धा प्रशासनाने त्यावर काहीच कारवाई केलेली दिसत नाही. वाढत्या लोकसंख्येचा मुंबई शहरावर पडणारा अतिरिक्त भार, रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल, मेट्रो रेल्वेमार्ग यांसारख्या विकासकामांमुळे रस्त्यांची झालेली दुर्दशा, त्यातच शहरातील वाढत्या वाहनांमुळे ठिकठिकाणी होणारी वाहतूक कोंडी यांमुळे शहराचा श्वास कोंडतो आहे, रेल्वे स्थानक, बस स्थानक आदी गर्दीच्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असणारे पदपथ अनधिकृत फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी चालायचे कोठून असा प्रश्न प्रतिदिन निर्माण होत आहे. त्यातच या फेरीवाल्यांनी सारे मार्ग दुतर्फा व्यापून टाकल्यामुळे त्यांच्या मागे असलेली अधिकृत दुकाने जी सरकारला वेळच्या वेळी कर भरतात ती झाकली जात आहेत. ज्याचा परिणाम या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होत आहे. महानगरपालिका अधिकारी आणि पोलीस यांपैकी कोणीच या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत नसल्याने आणि केली तरी ती केवळ नावापुरती असल्याने फेरीवाल्यांपासून सुटका करण्यासाठी सातत्याने कोणीनाकोणी न्यायालयाचे दरवाजे ठोठावत असतात.

२०१७ साली मुंबईतील एल्फिन्स्टन(आताचे प्रभादेवी) रेल्वे स्थानकाच्या पुलावर झालेल्या दुर्घटनेतून बोध घेऊन पालिका प्रशासनानेही मुंबईतील रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर पांढरे पट्टे आखून त्यांच्या आतील परिसरात फेरीवाल्यांना बसण्यास मज्जाव करणारा नियम बनवला. त्यानंतर या पट्ट्याच्या आत फेरीवाले बसणार नाहीत याची काळजीही प्रशासनाकडून काही दिवस घेण्यात आली; मात्र थोड्याच दिवसांत हा नियम बासनात बांधून रेल्वे स्थानकाजवळ पुन्हा फेरीवाले बसू लागले. रेल्वे स्थानकांजवळ रस्त्यांच्या दुतर्फा पदपथ फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे लोकांना रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागते. गर्दीच्या वेळी रस्त्यांवरील वाहतुकीच्या कोंडीमुळे त्यांतून वाट काढताना अक्षरशः नाकीनऊ येतात. फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी अधूनमधून महापालिकेची गाडी परिसरात फिरते मात्र ती येणार असल्याची बातमी फेरीवाल्यांना आधीच मिळाल्याने ते आपला माल झाकून ठेवून दूर निघून जातात. गाडी तेथून निघून गेली कि हे अनधिकृत फेरीवाले पुन्हा त्या ठिकाणी आपले बस्तान मांडतात. मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या परिसरात अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये बांगलादेशी तरुण मोठ्या प्रमाणात असल्याचे मध्यंतरी उघड झाले होते. या फेरीवाल्यांना बस्तान मांडण्यासाठी पदपथांवर जागा उपलब्ध करून देणे, त्या ठिकाणी विजेचे कनेक्शन उपलब्ध करून देणे, भांडवल उपलब्ध करून देणे, पोलीस आणि महापालिका यांच्या कारवाईपासून त्यांना वाचवणे यासाठी प्रत्येक रेल्वेस्थानक परिसरात म्होरके कार्यरत असून या म्होरक्यांचे महापालिका अधिकारी, स्थानिक पोलीस आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी आर्थिक हितसंबंध असतात ज्यामुळे त्यांचे हे धंदे वर्षोनुवर्षे बिनदिक्कतपणे सुरु आहेत. मुंबई-ठाण्यासारख्या मराठीबहुल शहरांत बहुतांश फेरीवाले हे परप्रांतीयच आढळून येतात. हे अनधिकृत परप्रांतीय फेरीवाले त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांसोबत अरेरावीने वागतात, त्यांच्याकडून वस्तू खरेदी न केल्यास ग्राहकांशी विनाकारण वाद घालतात. या मुजोर फेरीवाल्यांकडून स्थानिक ग्राहकांना आणि रहिवाशांना मारहाण झाल्याच्या घटना यापूर्वी बदलापूर, ठाणे, घाटकोपर यांसारख्या ठिकाणी घडल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांपेक्षा अनधिकृत फेरीवाल्यांची अधिक काळजी घेणाऱ्या महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाला न्यायालयाच्या आदेशानंतरही या अनधिकृत फेरीवाल्यांना हटवायचे नसेल तर नागरिकांच्या सुरक्षेसाठी भविष्यात सैन्याला पाचारण करण्याची वेळ आल्यास आश्चर्य वाटायला नको !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## साहेब... आम्ही गुडघाभर पाण्यातून शाळेत जाणार कसे?

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, कर्जत (अहिल्यानगर) :** साहेब, आम्ही शाळेत कसे जाणार? असा सवाल कर्जतमधील शाळकरी विद्यार्थ्यांनी प्रशासनाला केला आहे. गुडघाभर पाण्यातून विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागत असून पाण्यामध्ये अनेक वेळा सर्पांचे दर्शन होत आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी, कर्जत तालुक्यातील चिंचोली गावठाण ते मोरे वस्ती आणि खंडाळा येथील गोयकरवाडी या भागांना जोडणारा जुना रस्ता अनेक वर्षांपासून अत्यंत वाईट स्थितीत आहे. सन २०२२ मध्ये स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत तहसीलदार कार्यालयाकडे लेखी तक्रार अर्ज दिला होता. या अर्जावर कारवाई करत ऑक्टोबर २०२२ मध्ये तहसीलदारांनी रस्ता ग्रामस्थांना देण्यासाठी खुला करावा असा आदेश दिला होता.

आदेशाच्या अंमलबजावणीसाठी आलेल्या तलाठी व मंडळ अधिकार्यांना काही स्थानिक नागरिकांनी विरोध करत वाद घालून काम थांबवले. तेव्हापासून आतपर्यंत महसूल प्रशासनाला हा रस्ता खुला करता आलेला नाही. या रस्त्याचा वापर महिला, शाळकरी



विद्यार्थी, शेतकरी व वृद्ध व्यक्ती ये-जा करण्यासाठी पावसाळ्यात या रस्त्यावर गुडघाभर पाणी साचते आणि प्रवास जीवघेणा ठरतो. मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर वेड्या-बाभळीच्या झाडांनी अडथळा निर्माण केला आणि रस्ता पूर्णपणे बंद झाला. अनेक महिला शेतातून परतताना या झाडांमध्ये अडकून पडल्या होत्या. पाठीमागून ट्रॅक्टर आल्यामुळे त्यांना घरी जाता आले.

शेतामध्ये जाणार्या अनेक महिला या परिसरामध्ये खराब रस्त्यामुळे व पाण्यात पडून जखमी झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना पाण्यात साप दिसल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले, आणि काही विद्यार्थ्यांना शाळा बुडवावी लागली. गुडघाभर पाण्यातून या विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला प्रचंड वेड्या बाभळी आहेत. यामधून अनेक प्राणी रस्त्यावर येतात. रात्रीच्या वेळी अंधारात या रस्त्याने प्रवास करणे धोकादायक झाले आहे.

यामुळे या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक वेळा महसूल प्रशासन आणि ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा केला असूनही अद्याप कुणीही दखल घेतलेली नाही. या भिषण परिस्थितीमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी पाण्यात बसून घोषणाबाजी केली. राज्य सरकारने व महसूल मंत्र्यांनी अशा रस्त्यांबाबत कायदा करूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. असे येथे दिसून येते. त्यामुळे प्रांताधिकारी व तहसीलदार या रस्त्यासाठी काय भूमिका घेतात, याकडे आता सर्व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. यावेळी ग्रामस्थांसह महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काश्मीर...

पृथ्वीवरचे स्वर्गस्थळ
कश्मीरची सर्वांभुरळ
वातावरणातआस्वाद
गळून पडे ती मरगळ

मनोआजारी शेजारी
स्पोटक वखारजवळ
कसे राही कुणीसुखी
विषाने भरला कवळ

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

लाटूपाहे केंव्हापासून
शांत काश्मीर निर्मळ
पाहवेना दल लेकमधे
फुलले निस्पृह कमळ

पर्यटन बहरु आलेले
निसर्ग आनंद निखळ
दृष्ट लावतो पाकड्या
पांढरे करतात उखळ

विचीत्र शेपूट तुटलेले
कायम करी वळवळ
आंतकवादी पोसलेले
आर्थिकघडी डळमळ

प्रगति पथावरी भारत
उदरीत्याच्या मळमळ
द्वेष असूया निर्ढावली
कसे धुवावे कळमळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## 'जलसंधारण' प्रत्येकाचे कर्तव्य!

भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस लवकर येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरताना दिसत आहे. ७ जूनला महाराष्ट्रात दाखल होणारा मान्सून यावर्षी २५ मे रोजीच दाखल झाला आहे. पाऊस लवकर आल्याने बळीराजाची चिंता दूर झाली आहे. पाऊस लांबला की पेरण्या लांबतात आणि पेरण्या लांबल्या की बळीराजाचे पुढील सर्व नियोजन कोलमडते. सुदैवाने राज्यात वेळेवर पाऊस सुरू झाल्याने राज्यातील अनेक भागात होणारी पाणीटंचाई मिटली आहे. सध्या राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली आहे.

विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही दमदार पाऊस कोसळत आहे. मान्सूनपूर्व पावसानेही राज्यात चांगलाच धुमाकूळ घातला होता. आताही राज्यात दमदार पाऊस पडत आहे. राज्यात दमदार पाऊस पडत असल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. उजनी सारखे मोठे धरण आताच ४० टक्के भरले आहे. राज्यातील सर्व नद्या,नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने यावेळी चांगलीच कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि



मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. सुदैवाने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असल्याने पाणी टंचाई मिटली आहे असे असले तरी पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. यावर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय.

महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे. पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नगर-पुणे महामार्गावर भीषण अपघात टेम्पो दुभाजक तोडून कार वर आदळला



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** नगर-पुणे महामार्गावरील चास-कामरगाव घाटादरम्यान मालवाहू टेम्पो व कारचा भीषण अपघात झाला. समोरून येऊन टेम्पो कार वर आदळला या अपघातात कारचालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शिरूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दुभाजक तोडून टेम्पो कार वर आदळल्यामुळे हा भीषण अपघात घडलायाबाबत पोलिसांकडून समजलेली माहिती अशी की, पुण्याहून नगरच्या दिशेने येणारा मालवाहू टेम्पो (एमएच १२ व्हीएफ ८६४९) हा कामरगावहून पुढे चास गावालगच्या उतारावरच्या वळणावर येत असताना नगरहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या कारने (एमएच १४ एफजी ९९२८) कार आणि टेम्पो मध्ये अपघात घडला. यामध्ये चारचाकीत एकटे असणारे इनूस मोईनउद्दीन शेख (रा.शिरूर, जि.पुणे) गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या हातामध्ये, डोळ्यांमध्ये व शरीराच्या काही भागांमध्ये काचा घुसल्या होत्या. डोक्याला मार लागल्यामुळे ते गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असून, प्रकृती ठीक आहे. अपघातानंतर नगर तालुका पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या मार्गदर्शनाखाली जगदीश जंबे यांनी घटनास्थळी जाऊन मदत केली.

## शिवसेनेच्या उपतालुकाप्रमुख पदी सुशील चोरघडे यांची निवड



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.१६, धाराशिव :** कळंब तालुक्यातील बोरगाव धनेश्वरी येथील युवा नेतृत्व सुशील नामदेव चोरघडे यांची शिवसेना पक्षाच्या ईटकूर जिल्हा परिषद गटाच्या उपतालुकाप्रमुख पदी निवड करण्यात आली असून त्यांना निवडीचे पत्र धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक व अजित पिंगळे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. शिवसेना पक्षाचे उपजिल्हा प्रमुख अनंत वाघमारे तसेच कळंब शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख लक्ष्मीकांत हूलजूते यांनी सुशील चोरघडे यांना देण्यात आलेल्या निवडीच्या पत्रामध्ये म्हटले आहे की, हिंन्दु-हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने शिवसेनाप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रताप सरनाईक, संपर्क प्रमुख खा.रविंद्र गायकवाड, शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले, सहसंपर्कप्रमुख भगवानजी देवकते, अजित पिंगळे तसेच जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या आदेशाने आपली शिवसेना पक्षाच्या ईटकूर जिल्हा परिषद गटाच्या उपतालुकाप्रमुखपदी निवड केली आहे. हिंदू -हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर अनंत दिघे यांची शिकवण याचा प्रचार आणि प्रसार तसेच शिवसेना पक्षाच्या वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य करावे. अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. सुशील चोरघडे यांच्या निवडीबद्दल बोरगाव ध. शिवसेना शाखाप्रमुख अमोल चोरघडे, उपशाखा प्रमुख सचिन चोरघडे, कार्याध्यक्ष मनोहर सांगळे, कोषाध्यक्ष अतुल जाधव, सचिव गजानन पाटील, सहसचिव बालाजी सांगळे, संघटक अशोक चोरघडे, रंजीत चोरघडेसह ग्रामस्थांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## मांजरा प्रकल्पाचे शाखा अभियंता सुरज निकम यांची पदोन्नती



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१६, केज (बीड) :** केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा प्रकल्पाचे शाखा अभियंता सूरज निकम यांची उपविभागीय अधिकारी वर्ग १ या पदावर पदोन्नती झाली आहे. याबाबत जलसंपदा विभागाने नुकतेच पदोन्नतीचे आदेश निर्गमित केले असून त्यांना लातूर पाटबंधारे विभाग क्र.१ येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे. ५ तालुक्यातील शेतीच्या सिंचनासाठी व पिण्याचे पाण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या मांजरा प्रकल्पावर शाखा अभियंता म्हणून सूरज निकम हे मागील पावणेचार वर्षापासून कार्यरत होते. ते कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. सेवाकाळात त्यांनी प्रकल्पातील पाण्याचे अतिशय काटेकोर नियोजन केले. तसेच प्रकल्पाच्या नवीन कामासाठी व दुरुस्तीसाठी लागणारा निधी सातत्याने पाठपुरावा करून आणला आहे. अभियंता सुरज निकम यांनी बजावलेल्या सेवेबद्दल व झालेल्या पदोन्नती बद्दल मांजरा प्रकल्पातील कर्मचारी व परिसरातील शेतकऱ्यांनी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पाटबंधारे सिंचन शाखा धनेगाव चे कर्मचारी ठोंबरे.व्ही.एस, पठाण.के.एम, ताटे.डी.के, निलकंठ डाके, सुनिल पोटभरे, कासले, शेतकरी शामसुंदर खोडसे, बाबुराव लोकरे यांची उपस्थिती होती.

## तेलबिया पीक प्रत्यक्षिक घटकांसाठी ऑफलाईन अर्ज करावेत - कृषी अधिकारी पठाडे

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१६, केज (बीड) :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान सन २०२५-२६ साठी सोयाबीन पीक प्रात्यक्षिक घटकांसाठी केज तालुक्यातील शेतकरी गटांनी ऑफलाईन अर्ज करण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी केले आहे. कृषी कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पीक प्रात्यक्षिकांतर्गत लाभार्थी निवड करण्यासाठी गटाद्वारे ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबविण्यात आली. परंतु, लक्षांक पेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्याने कृषी संचालक यांनी दिनांक ११ जून २०२५ रोजी काढलेल्या पत्रानुसार ऑफलाईन अर्ज घेऊन पारदर्शी पद्धतीने गटाची निवड करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार महाडीबीटी द्वारे प्रथम अर्ज प्राधान्य नुसार केज तालुक्यातील २३ गावातील गटांची निवड करण्यात आली. यामध्ये कानडी बदन, देवगाव, कोरडेवाडी, पिंपळगाव, मस्साजोग,होळ, शिरूर घाट,नांदुर घाट, नायगाव, सातेफळ, दरडवाडी, पिसेगाव, काशीदवाडी, पैठण, शिरपुरा, कौडगाव, जानेगाव, कानडी माळी, सुकळी, माळेगाव आणि गोटेगाव या गावातील गट निवडलेले आहेत. त्यामुळे या गावा व्यतिरिक्त इतर गावातील गटांनी दि.१६ जून २०२५ ते १७ जून २०२५ रोजी ऑफलाइन पद्धतीने अर्ज करावेत. प्राप्त अर्जातून दि.१८ जून २०२५ रोजी ११ वाजता सोडती द्वारे निवड प्रक्रिया राबवण्यात येईल. केज तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी गट यांनी कृषी सहाय्यक कृषी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर अशी करावेत, असे आवाहन केज तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी केले आहे.

# लोकसहभागातून प्रभावी योग दिनाचे आयोजन करा - जिल्हाधिकारी डॉ.पाटील

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला तयारीचा आढावा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, बुलडाणा :** येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी योग दिनाच्या तयारीसंदर्भात अधिकाऱ्यांची सोमवारी आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी लोकसहभागातून प्रभावी योग दिनाचे आयोजन करा असे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. 'या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार , उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी डॉ.जयश्री ठाकरे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उपस्थित होते. या बैठकीत योग दिनाच्या आयोजनासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ.पाटील म्हणाले की, शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होऊ शकतील अशा मोकळ्या आणि सहज पोहोचता येतील अशा ठिकाणी योग दिनाचे कार्यक्रम आयोजित करावेत. अशा स्थळांची पाहणी करून आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. लोकप्रतिनिधी आणि संस्थांचा समावेश आवश्यक जिल्ह्यातील आमदार, खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, धार्मिक प्रतिष्ठाने, स्वयंसेवी संस्था आणि प्रतिष्ठित नागरिक यांना कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे, असेही त्यांनी सांगितले. योग हा जीवनशैलीचा भाग व्हावा यासाठी प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे ते म्हणाले.

योग दिनासाठी प्रशिक्षित आणि अनुभवी योग प्रशिक्षकांची नेमणूक करावी, तसेच शहरासह ग्रामीण भागातील जास्त लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करून योगविषयी जनजागृती करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

**आरोग्यदायी वातावरण निर्मितीचा उद्देश -**

योगा ही फक्त एक कृती नसून आरोग्यदायी जीवनशैलीकडे नेणारी वाट आहे. त्यामुळे नागरिकांनी नियमित योगाभ्यास करावा यासाठी सजगता निर्माण करणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी डॉ.पाटील यांनी स्पष्ट केले. बैठकीच्या अखेरीस सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून योग दिनाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडावा. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी प्रशासनाने आयोजित केलेल्या योग दिनाच्या कार्यक्रमात मोठ्यासंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात पत्राची होळी

## शिक्षकेत्तर, कर्मचारी पदभरती च्या स्थगितीला विरोध

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी भरती करण्यासाठी शासनाने सुधारित आकृतीबंध जाहीर करुन पदभरती करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार भरती प्रक्रिया सुरु झाली होती. परंतू त्याला २०२४-२५ च्या संचमान्यतेचे कारण देत संबंधित पदभरती स्थगित करण्यात आली.

गत १० ते १५ वर्षापासून कर्मचारी भरतीच नसताना केवळ संचमान्यतेचे कारण देत संबंधित पदभरती बंद करण्यात आली. या विरोधात शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचा पहिला टप्पा म्हणून मंगळवार, दिनांक १७ जून २०२५ ला चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात शिक्षण संचालकांच्या परिपत्रकाची होळी करुन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार असल्याचे संघटनेचे कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, सचिव प्रशांत हजारे यांनी सांगितले आहे. राज्यातील खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये २००५ नंतर शिक्षकेत्तर कर्मचारी पदाची भरती झालेली नाही. ही उठविण्यासाठी अनेक संघटनांनी लढा उभारला. त्यांच्या मागणीला २०१९ च्या सुधारित आकृतीबंधाने आधार मिळाला. परंतू २०१९ चा नवीन आकृतीबंध जाहीर करुन शासन शांत राहिले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर संघटनांचे महामंडळ आणि यासारख्या अन्य संघटनांनी लढा उभारत न्यायालयीन तसेच रस्त्यावरची लढाई लढत संबंधित पदभरती करण्यास शासनाला भाग पाडले होते.

त्यानुसार पदभरती सुरुदेखील झाली होती. परंतू माध्यमिक व उच्च माध्यमिकचे संचालक महेश पालकर यांनी एका परिपत्रकाद्वारे संबंधित पदभरती स्थगित करण्याचे निर्देश दिले आहेत. याचा विरोध शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेने केला असून याविरोधात संघटना यासमोर सुद्धा आक्रमक आंदोलन करणार असल्याचे सांगितले आहे.

### ३० हजार पदांची होणार होती भरती

नव्या आकृतीबंधानुसार राज्यातील शाळांमध्ये कनिष्ठ लिपिकांची १७ हजार ६९५ पदे, वरिष्ठ लिपिकांची ४ हजार ९१२ पदे, मुख्य लिपिकांची ०२३ पदे असतील. तसेच ग्रंथपालांची २ हजार ११८ पदे तर प्रयोगशाळा सहायक नववी ते दहावीची ४ हजार ६८५ पदे निर्माण होणार आहेत. सोबतच प्रयोगशाळा सहायक उच्च माध्यमिकची २ हजार ४० पदेही निर्माण केली जाणार आहेत. यातून अंदाजे ३० हजार पदभरती होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. परंतु, संबंधित पद भरती आता स्थगित झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# दिशा समितीच्या अंमलबजावणीचा खासदारांकडून आढावा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असलेले विषय तसेच केंद्राच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) कार्यरत आहे. या समितीच्या कामाच्या प्रगतीचा आढावा खासदार धानोरकर यांनी सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी घेतला.

नियोजन सभागृह येथे पार पडलेल्या या बैठकीला दिशा समितीचे सहअध्यक्ष खा. डॉ. नामदेव किरसान, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायकुटे व विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या, प्रधानमंत्री पीक विमा योजनेत अनेक लाभार्थी पीक विम्यापासून वंचित राहिले आहेत. पात्र लाभार्थ्यांना पीक विम्याची रक्कम लवकर देण्यात यावी. तसेच वाढीव किमतीने बी-बियाणे, खतांची विक्री होत असेल तर त्यांच्यावर कारवाई करून परवाने रद्द करावे.

जलजीवन मिशन मध्ये कंत्राटदारांनी सिमेंट काँक्रेटचे रस्ते फोडून टाकले आहे. नागरिकांना ये-जा करण्यासाठी त्रास होत आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदारांनी रस्त्याची डागडुजी करावी, तसे आदेश संबंधित विभागाने कंत्राटदारांना द्यावे. कुपोषण मुक्त जिल्ह्यासाठी एकात्मिक बालविकास विभागाने प्रभावी योजना राबवाव्यात. जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांचे बांधकाम त्वरीत पूर्ण करावे. घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध होत असली तरी रेतीघाटापासून वाहतुकीचा खर्च खुप जास्त येत आहे, याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. मोबाईलची रेंज राहण्यासाठी भारत संचार निगम लिमिटेडने टॉवरचे काम गतीने करावे. वरोरा ते माजरी रेल्वे स्टेशन दरम्यान टाकण्यात येणाऱ्या तिसऱ्या रेल्वे लाईनचे काम भुसंपादनासाठी दिलेल्या जमिनीवरच करावे, अतिरिक्त जागेवर काम करू नये.

राष्ट्रीय महामार्गाचे काम करतांना कंत्राटदारांकडून रस्त्यावरील प्रवासी निवाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. सदर प्रवासी निवारा कंत्राटदारांनी बांधून द्यावे. वरोरा-चिमूर महामार्ग अतिशय उंच असल्यामुळे रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ता नाही. शिवाय महामार्गावरील सर्व पाणी लगतच्या शेतात जात असल्यामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. यावर राष्ट्रीय महामार्ग आणि प्रशासनाने उपाययोजना करावी, अशा सुचना खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिल्या. यावेळी त्यांनी इतर ही विषयांचा आढावा घेतला. बैठकीत खा.डॉ.नामदेव किरसान यांनी आणि जिल्हाधिकारी विनय गौडा यांनीसुध्दा संबंधित विभागाला सूचना केल्या. संचालन आणि सादरीकरण उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायकुडे यांनी केले.

या विषयांचा आढावा दिशा समितीच्या बैठकीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, खनिज विकास, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महानेट, विशेष सहाय्य योजनेंतर्गत राज्य आणि केंद्र पुरस्कृत योजनांचे अनुदान, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत मिशन, अमृत योजना, एकात्मिक बालविकास योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री पीक विमा योजना, शिक्षण व इतर विषयांचा आढावा घेण्यात आला.

# राजेंद्र विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१६, खंडाळा (सातारा) :** प्राथमिक शिक्षण संचालक,पुणे व सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभाग पत्रान्वये राजेंद्र विद्यालय खंडाळा येथे सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी इ.०४ थी प्राथमिक शाळा उत्तीर्ण व इ.०५ वीत नवोदित विद्यार्थ्यांचे मोठया उत्साहात स्वागत करण्यात आले. दीर्घ उन्हाळी सुट्यांचा आनंद उपभोगून बालकांना नवीन शाळा हवीहवीशी वाटावी असा उद्देश महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागाचा असून या उपक्रमाअंतर्गत खंडाळा विभाग शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव गाढवे आणि सचिव अनिरुद्ध (संजीव) गाढवे यांच्या प्रमुख उपस्थितीत नवोगतांचे स्वागत व मोफत पाठयपुस्तक वाटप करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सचिव संजीव गाढवे म्हणाले, खंडाळा तालुका व पंचक्रोशीत शिक्षणाचा दर्जा उंच ठेवण्यासाठी राजेंद्र विद्यालय संकुल कटीबद्ध असून या संकुलात विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाच्या पल्याड जाऊन कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) प्रयोगशाळा, अटल टिंकरिंग प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, निसर्ग समृद्ध परिसर, उत्कृष्ट क्रीडा मैदान अशा सर्व सोयी सुविधायुक्त शाळा असून यामध्ये विद्यार्थ्यांना नवी उमेद मिळेल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी संचालक वसंतराव पंडित, शब्बीर नालबंद,सदस्य डीजी गाढवे,प्राचार्य पी.खांडे उपप्राचार्य अरुंधती गाढवे,सुशिला मोहिते,पर्यवेक्षक धनंजय महामुनी, ग्रंथपाल हणमंत यादव,शिक्षक सोमनाथ गर्जे,व्हीएन गाढवे यांची प्रमुख उपस्थिती होती. सातारा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नटराजन, प्राथमिक शिक्षणाधिकारी शबनम मुजावर, खंडाळा गटशिक्षणाधिकारी गजानन आडे, कक्षाधिकारी चोपडे, केंद्रप्रमुख सुनिता साबळे आदींनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

४ | अक्षराज | बुलडाणा, मंगळवार, दि.१७ जून २०२५ | संमिश्र

# शासनात विलिनीकरण करण्याच्या मागणीसाठी एस.टी कामगार आक्रमक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१६, मुंबई :** परिवहन मंत्री तथा एस.टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार सुनियोजन व निर्णयाचे विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने कर्नाटक परिवहन महामंडळ धर्तीवर एस.टी महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे परिपत्रक नुकतेच एस.टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी काढलं आहे. पुढील काही दिवसात एस.टी महामंडळाचे (एसटी) हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपले कार्यालय सुरू करतील.दरम्यान, या निर्णयानंतर आता एसटी कामगारांनी आपली जुनी मागणी पुढे केली असून शासन विलीनीकरणासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

शासनात विलिनीकरण करण्याच्या मागणीसाठी एसटी कामगार पुन्हा आक्रमक झाले आहेत. त्यामुळे एसटी कामगार पुन्हा मोठा संघर्ष उभारण्याच्या तयारीत आहेत. या लढ्याला व्यापक स्वरुप देण्यासाठी संघर्ष समितीच्या माध्यमातून पुन्हा एकत्र येण्याची तयारी सुरु करण्यात आली आहे. यासाठी एसटी कामगार सेनेने विविध २४ संघटनांना पत्र लिहून विलीनीकरणासाठी भूमिका मांडली आहे. दरम्यान, सत्ताधारी पक्षातील संघटनांनी नेतृत्व करण्याची विनंती केली आहे.



**दरम्यान एसटी कामगारांच्या प्रमुख मागण्या काय आहेत -**

एस.टी कामगारांना २०१६ पासून १ टक्के वार्षिक वेतनवाढ व १ टक्के घरभाडे भत्ता द्या. २०१८ पासुन जवळपास ७ वर्षांचा टप्प्याटप्प्याने वाढत गेलेल्या महागाई भत्त्याचा फरक द्या. १ एप्रिल २०२० पासुन ३१ मार्च २०२४ पर्यंत ६५०० रुपये वेतन वाढीचा ४ वर्षाचा प्रलंबित फरक द्या.शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्त्याचा दर २५ टक्के ओलांडल्यावर घरभाडे भत्ता अनुक्रमे ९ टक्के, १८ टक्के व २७ टक्के दराने द्यावा.

महागाई भत्त्याचा दर ५० टक्के झाल्यावर घरभाडे भत्त्याचा दर अनुक्रमे १० टक्के, २० टक्के, ३० टक्के दराने द्यावा.

दरम्यान, प्रादेशिक विभागानुसार एस.टी महामंडळाचे मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे व अमरावती असे ५ प्रादेशिक विभाग करण्यात आले आहेत. प्रत्येक प्रादेशिक विभाग अंतर्गत कार्यरत विभाग व मुख्यालय निश्चित करण्यात आले आहेत. प्रत्येक समितीसाठी आवश्यक तेवढ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, त्या-त्या भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वेळेत सेवा मिळण्यासाठी सर्व प्रकारचे नियोजन राबवले जाणार आहे. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ती अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याचे निर्देश दिले आहेत.

# सोलापुरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया सुरु

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१५, सोलापूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवगीय मुलांचे शासकीय वर्सातगृह अशोक नगर सोलापूर व मागासवर्गीय गुणवंत मुलांचे शासकीय वसतिगृह नबोन अशोक नगर विजापूर रोड सोलापूर या वसतिगृहामध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया चालू झालेली असून या वसतिगृहामध्ये अनु. जाती, जमाती, इतर मागास वर्ग, विमुक्त व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच दिव्यांग व अनाथ विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुसज्ज वातावरणात उत्तम शिक्षण देऊन त्यांना राष्ट्र उभारणीच्या मुख्य प्रवाहात सामिल करणे हे या योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

*प्रवेश कोणासाठी - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अशोक नगर सोलापूर या वसतिगृहात इयत्ता आठवी पासून पुढील उच्च व्यवसायिक व बिगर व्यावसायिक वर्गासाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो.

* मागासवर्गीय गुणवंत मुलांचे शासकीय वसतिगृह नवीन अशोक नगर विजापूर रोड सोलापूर या वसतिगृहामध्ये इयत्ता अकरावी व आय.टी.आय या वर्गातील विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश दिला जातो.

* गुणवत्ते नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना निशुल्क पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा -

* इ.८ ते १० वीच्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य.)

* महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रु.४०००/- शै. साहित्यासाठी (प्रति वर्ष)

* शालेय विद्यार्थ्यांना रु.१००० दोन गणवेशासाठी (प्रती वर्ष)

* महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रु. २०००/- दोन गणवेशासाठी (प्रती वर्ष)

* दारमाहा निर्वाह भत्ता रु.६००/-

* शैक्षणिक सहलीसाठी रु. २०००/- (प्रती वर्ष) व इतर सुविधा तसेच सुसज्ज भोजन कक्ष, प्रशस्त निवास व्यवस्था, कॉट, गादी व इतर बेडिंग साहित्य, पिण्यासाठी ठ.ज. फिल्टर पाणी, २४ तास सी.सी.टि.व्ही सुरक्षा, खेळासाठी क्रिडा साहित्य इत्यादी सुविधा विनामूल्य मोफत दिल्या जातात. अर्ज करण्याची प्रक्रिया दि.११ जून २०२५ पासून सन २०२५-२६ चे ऑनलाईन वसतिगृह प्रवेश अर्ज http://hmas.mahait.org या पोर्टलवर भरण्यात यावे. असे अहवान वसतिगृहाचे गृहपाल सुरेश काळे यांनी केले आहे. तसेच अधिक माहितीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अशोक नगर सोलापूर येथे संपर्क साधावा.

# इनरव्हिल क्लब कळंब कडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.१५, धाराशिव :** धाराशिव येथील इनरव्हिल क्लब कळंब च्या वतीने कळंब येथील विविध क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



त्यामध्ये कु.राजनंदिनी दत्ता पवार (Clat Maharashtra 1st rank all India 80), चि.पुष्कर पंडित दशरथ (१२वी ८८%), श्रेयस शिशिर राजमाने (JEE 92%), चि.सृजन अमित पाटील (ITO All India 4th Rank. Science/ Math Gold medal), कु.धनश्री सचिन पवार(Science General knowledge Gold Medal), कु. देवयानी दत्ता पवार (Olympiad Science/Math Gold medal), कु.वैदेही अभिजित लोंढे(Science Olympiad Gold Medal), चि.अथर्व सुधीर आवटे (Olympiad Science Gold medal), चि.श्रीहन सुशील डेंगळे (Scholarship Holder 5th Rank) चि.राजवर्धन सुशील तीर्थकर. (M.B.A. Culnary Art. Complete) चि.वेदांत गिरीष कुलकर्णी (बारावी ७३ टक्के ) चि.निनाद दर्शन पोरे (81% 12th Science CBSE Board Nashik), कु.वसुंधरा व्यंकट अनिगुंठे (DNB Exam. Pass), सिद्धी संजय देवडा (BDS) चि.श्रेयस धनंजय आडमुठे (90% 10th CBSE Board Aurangabad) या विद्यार्थ्यांचा व त त्यांना घडवणाऱ्या माता पालकांचा इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा प्रतिभा बाळकृष्ण भवर (गांगर्डे) यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा प्रतिभा बाळकृष्ण भवर (गांगर्डे), माजी क्लब अध्यक्षा डॉ.आकांक्षा पाटील, प्रोजेक्ट चेअरमन वैशाली दशरथ, सी.सी संगीता घुले, एडिटर वैष्णवी दशरथ, ट्रेझरर राजश्री देशमुख. आयएसओ डॉ. दिपाली लोंढे, स्वाती राजमाने डॉ.शिल्पा डेंगळे, डॉ.मेघा आवटे, कल्पना जाधवर, आशा नरहिरे, ज्योती पवार, रेखा तीर्थकर, डॉ.नंदा अनिगुंठे यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.दिपाली लोंढे केले व संगीता घुले यांनी आभार मानले.

# जि.प.शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रम अगदी उत्साहाने साजरा



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी प्रवेशोत्सव शाळेचा पहिला दिवस अंतर्गत नियोजनानुसार जिल्हा परिषद शाळा विंचूर येथे साजरा झाला.प्रवेशोत्सव कार्यक्रमात सकाळी गावातून शालेय विद्यार्थी यांची प्रभात फेरी काढण्यात आली. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची ट्रॅक्टरमधून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर नवागात विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.शिक्षणाचे पहिले पाऊल अंतर्गत पहिलीच्या विद्यार्थ्यांचे पायाचे ठसे कुंकूवाणे घेण्यात आले.नवीन विद्यार्त्यांना चॉकलेट वाटप करण्यात आले व विद्यार्त्यांची सेल्फी घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले.

शालेय पोषण आहार अंतर्गत विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी देवीसिंग परदेशी यांच्या तर्फे गोड शिरा व मसाले भात देण्यात आला. याप्रसंगी अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. मंत्री भुजबळ यांचे स्वीय सहाय्यक लोखंडे तसेच शिक्षण विभागाचे अधीक्षक श्रीधर देवरे, लोंढे नाना, सरपंच सचिन दरेकर, शिक्षण विस्तार अधिकारी वसंत गायकवाड, शाळेचे व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष वैभव दरेकर,शिक्षण तज्ञ ज्ञानेश्वर माऊली दरेकर, समिती सदस्य मुकुंद झाल्टे, गणेश चव्हाण हे पदाधिकारी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका कदम व शिक्षकवृंद यांनी 'प्रवेशोत्सव कार्यक्रम' अतिशय उत्साहाने साजरा केला.

# डॉ.व्ही पी शैक्षणिक संकुलामध्ये वृक्षारोपण सप्ताह



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१६, धाराशिव :** पर्यावरणाचे संतुलन हे मानवाला आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. त्यादृष्टीकोनातुन पर्यावरणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धनाच्या जाणीव जागृतीसाठी डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या नियोजनबद्द मार्गदर्शनाखाली डॉ.व्ही पी शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथे दि.०६ जून ते २६ जून २०२५ रोजी या कालावधीमध्ये संकुलातील सर्व महाविद्यालयाच्यावतीने वृक्षारोपण सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. दि.१६ जून २०२५ रोजी कृषी महाविद्यालयाच्या वतीने संकुलातील प्रक्षेत्रावर विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करून पर्यावरणाची जबाबदारी पार पाडण्यात आली. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा.हरी घाडगे, प्रा.डॉ.ए.ए गांदले, प्रा.डॉ.आर.आर इंगळे, प्रा.डी.एस शेटे, प्रा.ए.एस शिंदे, प्रा.पी.पी माळी, प्रा.ए.डी डोके, प्रा.एन.एम मुंडे, बालाजी मुंढे, विलास तौर तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात

# ठाणेकरांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन

## तब्बल दोन दिवस काही भागातील पाणीपुरठा राहणार बंद

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१६, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेला स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा अत्यावश्यक दुरुस्तीच्या कामामुळे गुरूवार, दिनांक १९ जून २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून रात्री ९.०० वाजेपर्यंत आणि शुक्रवार २० जून रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून रात्री ९.०० वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद रहाणार आहे. या काळात ठाण्याच्या काही भागात १२ तास पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

**पुढील भागातील पाणी पुरवठा राहणार बंद -**

ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेचे व्यवस्थापन करुन टप्प्याटप्प्याने ठाणे शहरात एक वेळ पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार, घोडबंदर रोड, पातलीपाडा, पवार नगर, कोठारी कम्पाउंड, आझाद नगर, डोंगरीपाडा, वाघवीळ, आनंद नगर, कासारवडवली, ओवळा इत्यादी ठिकाणाचा पाणी पुरवठा गुरुवार, दिनांक १९ जून २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून रात्री ९.०० वाजेपर्यंत आणि शुक्रवार, २० जून २०२५रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून रात्री ९.०० वाजेपर्यंत बंद राहील. तसंच, समता नगर, ऋतु पार्क, सिध्देश्वर, ईटरनिटी, जॉन्सन, जेल, साकेत, उथळसर, रेतीबंदर, कळवा व मुंब्रा येथील काही भाग येथे सकाळी ९ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत आणि शुक्रवार, दिनांक २० जून २०२५ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद राहील. अशा रीतीने टप्याटप्याने एक वेळ पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. दरम्यान, पाणी पुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करून ठेवावा. तसेच पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

# आर्य चाणक्य चा भव्य असा प्रवेशोत्सवाचा जल्लोष



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, पैठण (छ.संभाजीनगर) :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर येथील नवागतांचे स्वागत आणि प्रवेश दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. शाळेच्या प्रथम दिनी आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर येथील नवागतांचे स्वागत करण्यासाठी शाळेचा परिसर स्वच्छ करून फुलांची पाखरण, रांगोळी काढून,आंब्याचे तोरण, पताका, फुगे बांधून शाळा सुशोभित करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरूवातीला ढोल-ताशाच्या गजरात आणि फुलांच्या वर्षाव करत त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत पहिले पाऊल टाकणाऱ्या चिमुकल्यानी नवागतांचे औक्षण शाळेतील महिला शिक्षिका रेणूका गायकवाड, सोनाली कवडे यांनी केले. सोबतच प्रथम धूळ पाटीवर ॐ व श्री लिहीत व कागदावर हाताचे ठसे घेत नव चैतन्य निर्माण करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, प्रमुख अतिथी सुरज लोळगे, डॉ.पद्म कुमार कासलीवाल, विजयराव चाटुपळे, नंदकिशोर मालाणी, रेणुकादास गर्गे, मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते बालचिमुकल्यांना गुलाब पुष्प, खाऊ आणि पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल ताशा वाजवत उत्साही वातावरणात अनोख्या पध्दतीने स्वागत झाले. समारोप प्रसंगी माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे बोलताना म्हणाले की ही शाळा माझी आहे. मी यापूर्वी देखील शाळेसाठी योगदान केलेले आहे. आणि यापुढे देखील करणार आहे. शाळा म्हणजे एक संस्कार केंद्र आहे. आर्य चाणक्य विद्या मंदिर ही शाळा आपल्या पैठणच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान देणारी आहे. सर्व नवागतांना व शैक्षणिक वर्ष सर्व मुलांना शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी दत्ताभाऊ गोर्डे, डॉ.राम लोंढे, शिवाजी मारवाडी, किशोर भाकरे, डॉ. पांडुरंग मोरे, बाळासाहेब माने, बंडू आंधळे, देवेश इनामदार, सतीश आखेगावकर, विठ्ठल सावंत, सुरेश गायकवाड, रमेश खांडेकर, नरेश मानधणे , राहुल पगारे, प्रकाश वानोळे, पुनीत सराफ, अर्जुन दहिवाळ, ज्ञानेश्वर दहिवाळ, ज्ञानेश्वर नवले, अक्षय धुपे, डॉ.शांतीलाल राका, एकनाथ काळे, नंदकिशोर मगरे, ॲड.अशोक शेवतेकर, धर्मराज उजगिरे, ॲड.धनंजय चव्हाण, शेख (ASI), संतोष खीर्ले, नरेंद्र अंधारे, राजेंद्र जिवडे, कल्याण ढाकणे, भाऊसाहेब ठोकळे, अशोक करवा, डॉ.संजय खराद, अमोल कारके, भारत कासोदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीते साठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अंकल यांनी कष्ट घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विलास खर्डेकर, सुदाम पोल्हारे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमोद काकडे यांनी केले.

# सहकार हा समाजाच्या आर्थिक उन्नतीचा पाया - आमदार दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** सहकार ही सामूहिक प्रयत्नांतून सर्वांगीण प्रगती साधणारी संकल्पना आहे. ग्रामीण भागातील आर्थिक विकासात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा असून यामुळे शेतकरी, लहान उत्पादक आणि उद्योजकांना समान संधी मिळतात. सहकारात राजकारण नको, ही भूमिका तालुक्यातील सर्वांनी ठेवली, असे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते यांनी केले. पारनेर शहरातील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात जी.एस. महानगर बँकेच्या सभासद आणि कार्यकर्त्यांची आभार सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त तालुका विकास अधिकारी भाऊसाहेब भालेकर होते.

याप्रसंगी बँकेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके, उपाध्यक्ष भास्कर कवाद, सि.बा. अडसूळ, भास्कर खोसे, प्रभाकर कवाद, अशोक सावंत, सभापती किसन रासकर, माजी सभापती गणेश शेळके, सुरेश बोरुडे, गंगाराम बेलकर, डॉ. आबासाहेब खोडदे, शिक्षक नेते सुनील फापाळे, बाळासाहेब लामखडे, ठकाराम लंके, वसंत कवाद, निलेश खोडदे, सरपंच संतोष काटे आणि बँकेचे सर्व नवनिर्वाचित संचालक उपस्थित होते. आमदार दाते म्हणाले, वसुली हा बँकेचा आत्मा आहे. सर्व संचालकांनी एकसंघ राहून बँकेला नव्या उंचीवर न्यावे. यावेळी पारनेर ग्रामीण पतसंस्थेच्या वतीने उपाध्यक्ष सुरेश बोरुडे यांनी गीतांजली शेळके यांचा पुणेरी पगडी देऊन सत्कार केला.